**विदर्भ, खानदेश व मराठवाड्यात वस्त्रोद्योग :अनेक उद्योग गुंतवणुक करण्यास उत्सुक**

मंत्री (महसूल, कृषी व पदुम) यांचे

शिबीर कार्यालय, नागपुर

प्रसिध्दी पत्रक
नागपुर,दि.21 डिसेंबर 2015

विदर्भ, खानदेश व मराठवाड्यात वस्त्रोद्योग :अनेक उद्योग गुंतवणुक करण्यास उत्सुक

- एकनाथराव खडसे

नागपुर, 21 डिसेंबर : विदर्भ, खानदेश व मराठवाड्यात उद्योग उभारणीस प्रोत्साहन देण्याकरिता उद्योग विभागाने 17 डिसेंबर, 2015रोजी नागपुर येथे वस्त्रोद्योग चर्चासत्र आयोजित केले होते. त्यामध्ये राज्यात वस्त्रोद्योग येण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा झाली असून अनेक उद्योगांनी राज्यात गुंतवणुक करण्याची तयारी दर्शविली आहे, असे महसूल व कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज नियम 46 अन्वये मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन सादर करतांना सांगितले.

खडसे पुढे म्हणाले की, विदर्भ, खानदेश व मराठवाड्यात जेथे कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते, त्याठिकाणी वस्त्रोद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ, यवतमाळ, बुलडाणा जिल्हयातील चिखली, जळगांव जिल्हयातील जामनेर, औरंगाबाद जिल्हयातील कन्नड, परभणी जिल्हयातील सेलु, नंदुरबार जिल्हयातील भाल्हेर, नाशिक जिल्हयातील मालेगांव, नांदेड जिल्हयातील कृष्णुर आणि बीड जिल्हयातील माजलगांव येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत नव्याने वस्त्रोद्योग उद्यान अर्थात टेक्सटाईल पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव व बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

या वस्त्रोद्योग उद्यानात येत्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक व रोजगार निर्मिती होऊन वस्त्रोद्योग उद्योगांच्या माध्यमातून विदर्भ, मराठवाडा व खान्देश भागाच्या औद्योगिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. शासनाच्या प्रयत्नांची फलश्रृती म्हणुन भारतातील अग्रगण्य रेमण्ड उद्योग समुहाने अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ येथे 1,500 (एक हजार पाचशे) कोटी रुपयांपर्यंत गुंतवणुक करुन वस्त्रोद्योग उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यातून 7,500 रोजगार निर्मिती होणार आहे.

रेमण्ड उद्योग समुहाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने स्वीकारला असून या उद्योग समुहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौतम हरि सिंघानिया यांना नांदगांव पेठ येथील औद्योगिक क्षेत्रातील 500 एकर (200 हेक्टर) जमीन मंजुरीबाबत देकार पत्र आज दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी देण्यात आले आहे.

सद्यस्थितीत अतिरिक्त अमरावती (नांदगांव पेठ) औद्योगिक क्षेत्रात मे. शाम इन्डोफेम, मे.व्ही.एच.एम. इंडस्ट्रीज, सूर्या लक्ष्मी कॉटन मिल आणि मे.सीयाराम सिल्क मिल इत्यादी उद्योगांना एकूण 102 हेक्टर जमीन वाटप करण्यात आली आहे. यातून 2,200 कोटी रुपयांची गुंतवणुक व सुमारे 5,200 रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. वरील मे.शाम इन्डोफेम या उद्योगात उत्पादन सुरु असून इतर उद्योगांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्राची रोजगार निर्मिती क्षमता विचारात घेऊन या उद्योगास प्रोत्साहन देण्याचा तसेच तयार कापडावर मूल्यवर्धित प्रक्रीया करुन गारमेन्ट पार्कच्या माध्यमातून महिलांना देखील विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा राज्य शासनाच्या विचार आहे.

**-**